# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 24/10/2023 (मंगळवार) दुपार

---

. **फसवणुक**

पो.स्टे. काटोल :— अंतर्गत सराफा मार्केट, घोडे ज्वेलर्स काटोल येथे दिनांक ०३/१०/२०२३ ते दिनांक २३/१०/२०२३ चे १४.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सुकुमार प्रभाकरराव घोडे, वय ५४ वर्ष, रा. नेहरू बाजार काटोल यांचा वडिलोपार्जीत सोने चांदीचा व्यवसाय असुन **आरोपी नामे— श्रावण ज्ञानबाजी पारीसे, रा. सावरगांव ता. नरखेड जि. नागपुर** याने दिनांक ०३/१०/२०२३ रोजी फिर्यादीच्या दुकानात येवुन ०५.९०० मिली ग्रॅम वजनाची २२ कॅरेट स्टॅम्प असलेली १ अंगठी गहाण ठेवली त्यावर फिर्यादीने १०,०००/— रूपये दिले नंतर १५ दिवसांनी पुन्हा आरोपी हा दुकानात आला व त्याने माझा घरी पैशाची अडचण आहे असे म्हणुन मी ठेवलेली अंगठी विकायची आहे असे सांगितल्याने फिर्यादीने बाजारभावानुसार अंगठी विकत घेवुन आरोपीला २८,०००/— रूपये दिले त्यानंतर पुन्हा १० ते १५ दिवसांनी आरोपी फिर्यादीच्या दुकानात आला व शेतीसाठी पैशाची गरज आहे असे सांगुन ५.५ ग्रॅम वजनाची १ सोन्याची अंगठी विकली व फिर्यादीने ती विकत घेवुन आरोपीला ३२०००/— रूपये दिले. आरोपी कडुन २ सोन्याच्या विकत घेतलेल्या अंगठया गळविण्यासाठी कारागराकडे दिल्या असता दोन्ही अंगठयांचा रंग काळया पडल्या व त्या बेनटेक्सच्या असल्याचे कारागिराने सांगितले तसेच काटोल येथील अग्रवाल ज्वेलर्स यांचेकडे सोन्याचे शुध्दता पाहण्याच्या मशीनवर चेक केले असता त्या फक्त सोन्याचा मुलामा दिला असल्याचे सांगितले. यावरून फिर्यादीला आपली एकुण ७०,०००/— रूपयाची फसवणुक झाल्याचे समजले. परंतु फिर्यादीला आरोपीला रंगे हात पकडायचे असल्याने फिर्यादीने तक्रार दिली नाही व आरोपी दुकानात पुन्हा येण्याची वाट पाहीली असता दिनांक २३/१०/२०२३ रोजी आरोपी हा आला व त्याने त्या दिवशी सुध्दा १ सोन्याची अंगठी दुकानात विकायला आणली. मागील दोन्ही वेळेस फिर्यादीची फसवणुक झाल्याने व आजही आरोपी हा फसवणुक करण्याचे उददेशाने आला असता फिर्यादीने आरोपीला आपल्या दुकानात बसवुन ठेवले व पोलीस स्टेशनला येवुन सदर आरोपी विरूदध तक्रार दिली.

. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४१७, ४२० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय कोलटे पो.स्टे. काटोल मो. क्र. ८८०५४४८४१७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर